## पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

प्रकल्प प्रवर्तक मे. भिमा सहकारी साखर कारखाना लि. मधुकर नगर, पाटस, ता. दौंड, जिल्हा पुणे यांच्या प्रस्तावित RS/ENA/IA/Ethanol/Aviation इंधनाच्या उत्पादनासाठी ६५५ KLPD बहु-आहार कच्चा माल (मळी / उसाचा रस / धान्य) आधारीत डिस्टीलरी प्लान्टची नवीन स्थापना करुन डिस्टीलरीचा विस्तार (४५ KLPD पासून ७०० KLPD), साखर कारखान्याचा विस्तार (५००० प्र.मे.टन वरुन १५००० प्र.मे.टन) तसेच सह-विजनिर्मिती प्रकल्प (१९.५ मेगावॅट वरुन ७० मेगावॅट) आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लँट (सी.बी.जी. ३० टन प्रति दिवस)

---

भिमा सहकारी साखर कारखाना लि. मधुकर नगर, पाटस, ता. दौंड, जिल्हा पुणे महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित RS/ENA/IA/Ethanol/Aviation इंधनाच्या उत्पादनासाठी ६५५ KLPD बहु-आहार कच्चा माल (मळी / उसाचा रस / धान्य) आधारीत डिस्टीलरी प्लान्टची नवीन स्थापना करुन डिस्टीलरीचा विस्तार (४५ KLPD पासून ७०० KLPD), साखर कारखान्याचा विस्तार (५००० प्र.मे.टन वरुन १५००० प्र.मे.टन) तसेच सह-विजनिर्मिती प्रकल्प (१९.५ मेगावॅट वरुन ७० मेगावॅट) आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लँट (सी.बी.जी. ३० टन प्रति दिवस) क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी शुक्रवार दि. २०-०६-२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळी आयोजित करण्यात आलेली होती.

मा. श्री कार्तिकेय लंगोटे, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ पुणे तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी मा. श्री नामदेव टिळेकर, अध्यक्ष तथा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पुणे, मा. श्री. नवनाथ अवताडे, प्रादेशिक अधिकारी यांचे प्रतिनिधी तथा उप-प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, पुणे, तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे स्वागत करुन मा.अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणी सुरु करण्याकरीता परवानगी दिली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४-०९-२००६ आणि सुधारित दि. ०१-१२-२००९ च्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी असे सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक भिमा सहकारी साखर कारखाना लि. मधुकर नगर, पाटस, ता. दौंड, जिल्हा पुणे यांच्या प्रस्तावित RS/ENA/IA/Ethanol/Aviation इंधनाच्या उत्पादनासाठी ६५५ KLPD बहु-आहार कच्चा माल (मळी / उसाचा रस / धान्य) आधारीत डिस्टीलरी प्लान्टची नवीन स्थापना करुन

डिस्टीलरीचा विस्तार (४५ KLPD पासून ७०० KLPD), साखर कारखान्याचा विस्तार (५००० मे.टन/दिन वरुन १५००० मे.टन/दिन) तसेच सह-विजनिर्मिती प्रकल्प (१९.५ मेगावॅट वरुन ७० मेगावॅट) आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लँट (सी.बी.जी. ३० टन प्रति दिवस) क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार हा प्रकल्प श्रेणी अ, प्रकल्प किंवा क्रियाकलाप ५(g) डिस्टीलरी, ५(j) साखर उद्योग, १(d) सहवीज निर्मिती प्रकल्पमध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची पर्यावरण अनुमती प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोक सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (TOR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दि. २३-०८-२०२४ रोजी सादर केला. व त्या अर्जास वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १३-०१-२०२५ रोजी तज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (TOR) मान्यता प्रदान केली.

मा.अप्पर जिल्हा दंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी पुणे यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार दिनांक २०-०६-२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई यांनी भारत सरकारच्या दि. १४-०९-२००६ आणि सुधारित दि. ०१-१२-२००९ च्या अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. J-११०११/११५/२००८-IA-II(I) दि. १३-०१-२०२५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत केली.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हा दंडाधिकारी, पुणे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | अध्यक्ष |
| २) प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे | - | सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे- १<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे | - | आयोजक |

समन्वयक यांनी सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज शुक्रवार दि. २०-०६-२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहीर सुचना दि. १४-०५-२०२५ च्या स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व द इंडीयन एक्सप्रेस या इंग्रजी वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सुचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था यांना आवाहन करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे., जिल्हा उद्योग केंद्र, पुणे. , जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. , प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३., मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२., झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ३२., उपविभागीय अधिकारी, दौंड, तालुका दौंड जिल्हा पुणे., तहसील कार्यालय, दौंड, तालुका दौंड जिल्हा पुणे., पंचायत समिति कार्यालय, दौंड, तालुका दौंड जिल्हा पुणे., ग्रामपंचायत कार्यालय,पाटस, कुरकुंभ, कुसेगाव, पडवी, बिरोबाचीवाडी, वरवंड, रोटी, कानगांव, ता. दौंड, जि. पुणे., व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी/तोंडी सुचना द्यावयाच्या असल्यास त्या त्यांनी सादरी करणानंतर आपले नाव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील.

सदरहू बैठकीतचे इतिवृत्त तयार करण्यात येवून ते महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, पर्यावरण, वन और जलवायु परिवर्तन मंत्रालय (MoEF&CC), इंदिरा पर्यावरण भवन, नई दिल्ली यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना / आक्षेप यांची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडीओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफीत, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येतो. यानंतर मा.अध्यक्ष यांना सुनावणी सादरीकरणास परवानगी देण्याची विनंती केली.

मा.अध्यक्ष यांनी पर्यावरण विषयक जाहिर जुनसुनावणीसाठी पुणे शहरात आलेल्या वारीचे नियोजन व अकस्मीत कामकाजामुळे उशीर झाल्याने ठरल्या वेळेपेक्षा दोन तास उशीरा सुरु झाल्यामुळे दिलगीरी व्यक्त केली.

मा.अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पा विषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण करताना सांगितले की पर्यावरण अधिसुचनेनुसार सदरहू प्रकल्प श्रेणी अ, प्रकल्प किंवा क्रियाकलाप ५(g) डिस्टीलरी, ५(j) साखर उद्योग, १(d) सहवीज निर्मिती मध्ये मोडत असून त्यास वन और जलवायु परिवर्तन मंत्रालय (MoEF&CC), इंदिरा पर्यावरण भवन, नई दिल्ली यांची पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करणे बंधनकारक आहे.

प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

सदरहू प्रकल्पामुळे अंदाजे ६२६ व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधी मिळणार आहे. मात्र सदरहू प्रकल्पामुळे प्रकल्प परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

तसेच प्रकल्पाची एकूण भांडवली गुंतवणूक रु २०७३.०६ कोटी आहे. तर पर्यावरण संरक्षणासाठी रु १३४.०० कोटी एवढा व रु १३.२२ कोटी प्रति वर्षी निधीची तरतुद करण्यात आली आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी, उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना किंवा आक्षेप नोंदवितांना आपले नाव व गावाचे नाव सांगण्याची सूचना करण्यात आली.

खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक / पर्यावरण विषयक जनसुनावणी यांनी दिलेली उत्तरे

**१) श्री सचिन शितोळे रा. पाटस, जिल्हा दौंड यांनी डिस्टीलरी मधून बाहेर पडणाऱ्या सांडपाणी माझ्या शेतातुन जात असल्याकारणाने प्रचंड त्रास होतो याबाबतचा मागील ७ ते ८ वर्षापासून पाठपुरावा करत असून , त्याबाबत सदर कारखान्याच्या व्यवस्थापनाकडे तक्रार करुन सुध्दा कारखान्याच्या व्यवस्थापनाने दखल न घेतल्याबाबत सांगून कारखान्याबद्दल आत्मियता असल्याने आम्ही वर पर्यंत तक्रार केली नाही असे सांगितले.**

उत्तर - कारखान्याचे जनरल मॅनेजर यांनी सदर बाबतीत खुलासा करतांना सांगितले की, विस्तारिकरणा अंतर्गत मशिनरीमध्ये आधुनिकीकरण करण्यात येत असून प्रकल्पातील स्पेंट वॉश इन्सीनरेशन बॉयलरमध्ये जाळले जाणार आहे. त्यामुळे स्पेंट वॉश बाहेर जाणार नाही.

**२) श्री अमोल शितोळे रा. पाटस यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या जबाबदारीबाबत विचारणा केली. तसेच स्वतंत्र प्रदुषण अधिकारी नेमावा व उडणाऱ्या राखेचा प्रश्न मिटवावा.**

उत्तर - यावेळी आयोजक प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी प्रदुषण कार्यालयास या कारखान्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. कारखाना व्यवस्थापना बाबत कोणतीही तक्रार आल्यास त्याचा पाठपुरावा करुन ती सोडविण्यात येईल.

कारखान्याचे कार्यकारी संचालक यांनी स्वतंत्र प्रदुषण अधिकारी नेमून त्यांचे नाव व फोन नंबर कळविले जाईल तसेच विस्तारिकरणा अंतर्गत आधुनिकीकरण केल्यानंतर राखेचा प्रश्न शिल्लक राहणार नाही, अशी ग्वाही दिली.

**३) श्री दिनेश शितोळे रा. पाटस यांनी आमच्या गावाचा काय फायदा होणार आहे असे प्रश्न विचारले.**

उत्तर - कारखान्याचे जनरल मॅनेजर यांनी विस्ताकरणासोबत आधुनिकीकरण झाल्यास शेतकऱ्याचे ऊस वेळेवर गाळप होवून, ऊसास चांगला दर मिळणार आहे, रोजगार प्राप्त होणार आहे. परिसरातील विकास कामे सीएसआर फंडामधून करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना कंपोस्ट खत, सौर ऊर्जा व वृक्षारोपणाचा मागणी आल्यास कारखान्याकडून पुरवठा करण्यात येणार आहे. या विस्तारीकरणाचा उद्देशच हा आहे की, या परिसरातील शेतकरी, शेतमजूर, कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व गावांचा विकास कसा साधता येईल.

त्याचबरोबर बेणेमळा तयार करुन चांगल्या प्रतीचे बेणे देवून सध्याच्या टनेजमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न राहणार आहे.

**४) श्री अशोक पानसरे रा. पाटस यांनी कारखाना आमच्या गावाची शान आहे. कारखान्याच्या कोणत्याही प्रकल्प विस्तारास आमचा विरोध नाही या बाबत आमच्या ग्राम सभेमध्ये ठराव देखील संमत करण्यात आलेला आहे.**

उत्तर - कारखान्याचे कार्यकारी संचालक यांनी पाटस हे गाव कारखान्याचा आत्मा असून गावा बरोबरच परिसराचा विकास, उन्नती कशी करता येईल त्याकरीता कारखान्याकडून प्रयत्न सुरु आहेत. विस्तारीकरणानंतर या भागातील राखेचा व धुराचा (काजळीचा) प्रश्न मार्गी लागणार आहे. त्याकरीता अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात येत आहे. परिसरातील शेतकऱ्यांचा कसा विकास साधता येईल यासाठी कारखान्याचे व्यवस्थापन प्रयत्नशील आहे.

**५) श्री शंकर शितोळे रा. पाटस यांनी विस्तारीकरणानंतर परिसराचा विकास होईल याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दीकरण देणे आवश्यक आहे.**

उत्तर - कारखान्याचे कार्यकारी संचालक यांनी विस्तारीकरणानंतर या भागातील राखेचा व धुराचा (काजळीचा) प्रश्न संपूर्णपणे मिटणार आहे. त्याकरीता अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे कामकाज

सुरु आहे. परिसरातील शेतकऱ्यांचा कसा विकास साधता येईल यासाठी कारखान्याचे व्यवस्थापन प्रयत्नशील आहे.

**६) श्री प्रविण शितोळे रा. पडवी यांनी नवीन विस्तारीकरणास आमची कोणतीही हरकत नाही फक्त बेणे / बांबूरोपे मोफत द्यावेत अशी मागणी केली.**

उत्तर - कारखान्याचे कार्यकारी संचालक यांनी या भागातील शेतकऱ्यांना उत्तम प्रतीची रोपे देण्याचा प्रयत्न राहील असे सांगितले.

**७) श्री केशव दिवेकर रा. वरवंड यांनी आमच्या गावाची विस्तारीकरणाला कोणतीही अडचण होणार नाही. हे विस्तारीकरण झाल्यानंतर परिसराचा विकास होईल असे मत व्यक्त केले.**

उत्तर - कारखान्याकडून धन्यवाद देण्यात आले.

मा. आमदार श्री राहुलदादा कुल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थितांनी विस्तारीकरण प्रकल्प उभारणीस दिलेल्या सहकार्या बद्दल धन्यवाद दिले. तसेच स्पेंट वॉश व काजळीची समस्या सुटावी यासाठीच अद्यावत तंत्रज्ञानाद्वारे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. विस्तारिकरणानंतर आपल्या भागातील ऊसाचे वेळेवर गाळप होऊन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊसाचा दर देणे शक्य होणार आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात पाणी पुरवठ्याच्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाकडून रु ५००/- कोटी मंजूरी देण्यात आली आहे. पाटस गाव व परिसराचे जे-जे चांगले काम करता येईल ते-ते करण्याचा प्रयत्न सुरु असून मी व्यक्तीशः सर्वांच्याचसाठी उपलब्ध असून कोणाच्या काही अडचणी असल्यास त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले. आपला कारखाना आजारी अवस्थेतून सुदृढ करण्यामध्ये आपणा सर्वांचे सहकार्यही अपेक्षित असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच कारखान्या मार्फत शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येत असून अडचणी दूर करणे, प्रदुषणाची समस्या कमी करणे याकरीता प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की, मोठ्या प्रमाणात जनसुनावणीस उपस्थित असलेल्या जनतेच्या वेगवेगळ्या प्रश्नांमधून बऱ्याच शंकांचे निरसन झालेले असून कारखान्याकडून प्रदुषणाच्या नियमांचे पालन व्हावे व योग्य त्या उपाययोजना कराव्यात असे सांगून जनसुनावणी पूर्ण झाल्याने सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

जनसुनावणीसुरु होण्यापुर्वी या कार्यालयाकडे ०२ सुचना/टिपणी प्राप्त झाल्या अनुक्रमे १. श्री.वसंत विनायक साळुंखे पाने १ ते ६ व २. श्री.सुजित ढमाले पाने १ ते ५ त्यांची प्रत सोबत जोडली आहेत.

(श्री.कार्तिकेय लंगोटे)
समन्वयक
उपप्रादेशिक अधिकारी, पुणे- १,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

(श्री. नवनाथ अवताडे)
सदस्य
उप प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय
महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, पुणे

(मा.नामदेव टिळेकर)
अध्यक्ष
मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी,पुणे